TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 8 **Subject:** Marathi **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 **Paper:** Unit 1 **Marks:**20

**(विभाग - १ : गद्य)**

**Q1) पुढील उताऱ्याचा आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(8)**

(1) एका वाक्यात उत्तर लिहा: (2)
(1) माणसांच्या जीवनाला अर्थ कशामुळे प्राप्त झाले आहे?
(2) पोटोबाला कोण अद्दल घडविणार आहे?

**नासिका :** म्हटल कर्णिक, तुझ्या पेक्षाही माझा उपयोग जास्त महत्त्वाचा आहे बर का श्वास घेतल्याशिवाय माणूस जगू शकेल का?
जिव्हाताई : आणि माझ्या मुळेच तर माणसांच्या जीवनात अर्थ आहे. मी गोड बोलते, नाना तऱ्हेच्या पदार्थांची चव माझ्या मुळेच मानव चाखू शकतो. आपण सारेजण अनेक कामे करतो, पण हे पोटोबा मात्र आयते बसून खातात. तेव्हा आपण या पोटोबाविरुद्ध सप करुया आणि मंदूराजेसाहेबांकडे तक्रार करूया.
**नयनकुमार :** हो, हो, आमची तयारी आहे संप करण्याची आजपासून मी बघणार नाही.
नासिका : मी वास घेणार नाही, श्वास मात्र मला घ्यावाच लागेल.
**कर्णिका :** मी ऐकणार नाही.
**जिव्हाताई :** मी अजिबात खाणार नाही आणि दंतराजानामुडा संपात सामील करून घेईन.
**हस्तकराज :** मी घास उचलणार नाही.
**पदकुमार :** मी स्वयंपाकघरापर्यंत जाणार नाही, म्हणजे मग त्या पोटोबाला चांगलीच अद्दल घडेल.

TickMark.Ai

(2) (1) चौकटी पूर्ण करा: (1)
(i) पोटोबाची तक्रार यांच्याकडे करणारा - ..................... .
(ii) अजिबात न खाणारे - ..................... .

(2) सत्य की असत्य ते लिहा: (1)
(i) हस्तराज घास उचलणार नाही.
(ii) जिव्हा ताईलाच श्वास घ्यावा लागतो.

(3) अव्यय ओळखा: (2)
(1) मेंदूराजेसाहेबांकडे तक्रार करुया.
(2) पटलं ना सर्वांना!

(4) अवयव आपली कोणकोणती कामे करणार नाहीत? याचे कारण लिहा. (2)

**(विभाग - २ : पद्य)**

**Q2) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(6)**

1) एका वाक्यात उत्तर लिहा: (2)
(1) कवीच्या मते व्यक्तिमत्त्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील ?
(2) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
भव्य पटांगण, बाग मनोहर

फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्त्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने , नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

(2) जोड्या लावा: (2)

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. नव्या युगाच्या नभात | अ. व्यक्तित्वाची जडणघडण |
| २. प्रतिभेची प्रभात | आ. स्वतःचे अस्तित्व मजबूत करणे |
| ३. पायाभरणी आस्तित्वाची | इ. नवानिर्मितीची पहाट |
| ४. व्यक्तित्वाची प्रयोगशाळा | ई. नव्या विचारांच्या क्षेत्रात |

TickMark.Ai

(3) तुम्हांला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा. (2)

**(विभाग - ३ : भाषाभ्यास)**

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा : (6)**

(1) खालील शब्दांचे वचन बदला (1)
(1) गाणे - (2) पुस्तक -

(2) अचूक शब्द ओळखा (1)
दुर्घटाना, दुर्घटना, दुर्घाटाना

(3) खालील शब्दांच्या जाती ओळखा (1)
पुढील वाक्यातील सर्वनामे ओळखा:
त्याला इकडे बोलव.

(4) शब्दसमूहापासून दोन शब्द तयार करा (1)
घणघण सारखे दोन शब्द तयार करा.

(5) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा (1)
शहर

(6) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा (1)
(1) आत x (2) फायदा x

All the Best